# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगर पालिका, नागपूर अंतर्गत नगरभुमापन क्रं. १०२ मौजा - **{प्रकल्प विभाग}** नागपूर मोमिनपूरा येथे विद्यार्थ्याकरीता अत्याधुनिक ई-लायब्ररीचे बांधकाम तयार करण्याच्या कामास शासन निर्णय क्रं मनपा-२०२४/प्र.क्रं.४०(५८)/नवि-१६(ई-७३१३७१) दि. २२ फेब्रुवारी, २०२४ अन्वये "महानगर पालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विषेश तरतुद" योजने अंतर्गत शासनाचे निधि मंजुरी आदेश प्राप्त आहे.

मोक्यावर लायब्ररी अति जिर्ण अवस्थेत असल्यामुळे जुणे बांधकाम पाडण्याकरीता मा. प्रशासक मनपा, नागपूर यांनी ठराव क्रं. ७५/मनपा/प्रशासक/दि. ०९.०७.२०२४ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर कामाची ऑनलाईन निविदा बोलावण्यात आली असुन निम्मतम निविदाकार मे. प्रफुलवेद इन्फ्रा प्रा.लि. नागपूर यांचे २१.००% कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त महोदयानी दि. ०६/०९/२०२४ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

करीता मे. प्रफुलवेद इन्फ्रा प्रा.लि. नागपूर यांची २१.००% कमी दराच्या इतर अनुषांगिक राशीसह रु. १५,५९,७२,६७०/- राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेण्याकरीता मा. प्रशासक मनपा यांचे मान्यतेस्तव सादर.

टिप :

१. प्रस्तुत कामाकरीता सन २०२३-२४ लेखाशिर्ष ४२१७०५४१ अंतर्गत शासनातर्फे नागपूर महानगरपालिकेला रु. २०.०० कोटीच्या मंजुरीपैकी सन २०२४-२५ मध्ये १०% राशीची तरतुद उपलब्ध आहे.
२. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्रं. जिप्रकाना/मुलभुत प्र.मा./कावि-३१/२०२४/दि. १९.०७.२०२४ अन्वये प्रशासकिय मंजुरी प्रदान केलेली आहे.
३. सदर कामाचे निम्मतम निविदाकर मे. प्रफुलवेद इन्फ्रा प्रा.लि. नागपूर यांचे २१.००% कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केलेली आहे.
४. सदर कामाकरीता मा. मुख्य अभियंता यांची CE/PWD/T.S./८९/२०२४-२५/दि. २३.०७.२०२४ अन्वये तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
५. निस्तृत टिपणी नस्तीत संल्गन आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 1023/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 12/09/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प-3), प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगर पालिका, नागपूर अंतर्गत नगरभुमापन क्रं. १०२ मौजा - नागपूर मोमिनपूरा येथे विद्यार्थ्याकरीता अत्याधुनिक ई-लायब्ररीचे बांधकाम तयार करण्याच्या कामास शासन निर्णय क्रं मनपा-

२०२४/प्र.क्रं.४०(५८)/नवि-१६(ई-७३१३७१) दि. २२ फेब्रुवारी, २०२४ अन्वये "महानगर पालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विषेश तरतुद" योजने अंतर्गत शासनाचे निधि मंजुरी आदेश प्राप्त आहे.

मोक्यावर लायब्ररी अति जिर्ण अवस्थेत असल्यामुळे जुणे बांधकाम पाडण्याकरीता मा. प्रशासक मनपा, नागपूर यांनी ठराव क्रं. ७५/मनपा/प्रशासक/दि. ०९.०७.२०२४ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर कामाची ऑनलाईन निविदा बोलावण्यात आली असुन निम्मतम निविदाकार मे. प्रफुलवेद इन्फ्रा प्रा.लि. नागपूर यांचे २१.००% कमी दराच्या निविदेला मा. आयुक्त महोदयानी दि. ०६/०९/२०२४ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

करीता मे. प्रफुलवेद इन्फ्रा प्रा.लि. नागपूर यांची २१.००% कमी दराच्या इतर अनुषांगिक राशीसह रु. १५,५९,७२,६७०/- राशीचा कार्यादेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.